कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पास मंजूरी देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्र. आव्यप्र-२०२१/प्र.क्र.१७६/आव्यप्र-१**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १० नोव्हेंबर, २०२१
**वाचा** :- मंत्रीमंडळ बैठक इतिवृत्त दि. २३.०७.२०२१

**प्रस्तावना:-**

कोकण विभागात सतत येणाऱ्या नैसर्गिक आपत्ती जसे चक्रीवादळ, अतिवृष्टी, भूस्खलन इ. मुळे राज्याला मोठ्या प्रमाणात मानवी जीवन व मालमत्तेच्या हानीचा सामना करावा लागतो. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापन सौम्यीकरणाच्या उपाययोजना राबवून आपत्तीमुळे होणारी जिवीत हानी शुन्यावर आणणे, आपत्तीमुळे सर्वसामान्य जीवन कमीतकमी विस्कळीत व्हावे, तसेच वित्तीय हानीचे प्रमाण कमीत कमी करण्यासाठी कायम स्वरूपी उपाययोजना करण्याचे उद्दीष्ट निर्धारीत करून कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्प राबविण्यात येणार आहे. त्यानूसार

कोकण विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करून आपत्ती सौम्यीकरण करण्यात येणार आहे. याची अंमलबजावणी करण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. प्रस्तावात सदर उपाययोजना कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय –**

१. कोकण किनारपट्टीवरील जिल्ह्यात चक्रीवादळासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान विचारात घेऊन 'कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्प' या नावाने विशेष प्रकल्प राबविण्यास मंत्री मंडळाने तत्वत: मान्यता दिलेली आहे. या प्रकल्पामध्ये खालील उपाययोजनांचा समावेश करण्यात येत आहे. त्यासाठी होणाऱ्या अंदाजित खर्चास शासनाची तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

१. धूप प्रतिबंधात्मक बंधारे
२. भूमिगत विद्युत वाहिन्या
३. बहूउद्देशिय चक्रीवादळ निवारा केंद्र तयार करणे
४. वीज अटकाव यंत्रणा उभारणे.
५. पूर्व सुचना प्रणाली निर्माण करणे
६. दरडप्रवण क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाय करणे

उपरोक्त कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्प राबविण्यासाठी होणाऱ्या अंदाजित रु. ३२०० कोटी पर्यंत होणाऱ्या खर्चास मंत्रीमंडळाने तत्वत: मान्यता दिली आहे. त्यामुळे वरील उपाययोजना राबविण्यासाठी स्वतंत्रपणे प्रशासकीय मान्यता देतांना सर्व उपाययोजनांच्या खर्चाची एकत्रित मर्यादा रु. ३२०० कोटी पेक्षा जास्त होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

वरील कार्यक्रमासाठी मंत्रीमंडळाने तत्वत: मान्यता दिलेल्या रु. ३२०० कोटी इतक्या निधीपैकी रु. २००० कोटी इतका निधी पुढील कालावधीत प्राप्त होणाऱ्या राज्य आपत्ती सौम्यीकरण निधीतून उपलब्ध करण्यात येईल व उर्वरित

रु. १२०० कोटी इतका निधी पुढील ४ वर्षात (सन २०२२-२०२५) या कालावधीत टप्याटप्याने राज्य निधीमधून उपलब्ध करण्यात येईल. राज्य आपत्ती सौम्यीकरणातून प्राप्त होणारा निधी खर्च करण्यास राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची मान्यता घेण्यात येईल. तसेच राज्य योजनेतून प्राप्त होणाऱ्या रु. १२०० कोटी निधीतून वर उल्लेख केलेल्या उपाययोजनांपैकी कोणता कार्यक्रम राबविण्यात येईल, याबाबत आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग निर्णय घेईल.

२. राज्य आपत्ती धोके व्यवस्थापन निधीसाठी सन २०२०-२०२१ ते सन २०२५-२०२६ या कालावधीत प्राप्त होणाऱ्या निधीपैकी १०% निधी पूर्व तयारी व क्षमता बांधणी तसेच २०% निधी राज्य आपत्ती सौम्यीकरण निधी म्हणून उपलब्ध होणार आहे. सदर निधीतून राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी प्रकल्प संनियंत्रण गट (Project Monitoring Unit) व सल्लागाराची नियुक्ती करण्यास देखील मंत्रीमंडळाने तत्वत: मान्यता दिली आहे.

या निधीचे योग्य व सर्वसमावेशक वापरासाठी ४ वर्षासाठी बृहतआराखडा तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे याकरिता वरीलप्रमाणे नियुक्त करण्यात येणाऱ्या प्रकल्प संनियंत्रण गटाची नियुक्ती व सल्लागारची नियुक्तीसाठी होणारा खर्च क्षमता बांधणी व पूर्व तयारीसाठी उपलब्ध होणाऱ्या निधीच्या ७% निधीच्या मर्यादेत व सौम्यीकरणासाठी उपलब्ध निधीच्या ३% मर्यादेत राज्य योजनेतून मंजूर होणाऱ्या नियत व्ययातून खर्च करण्यास तत्वत: शासन मान्यता देत आहे.

३. कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत योजना राबविण्यासाठी राज्य योजनेतून करण्यात येणाऱ्या सुमारे रु. १२०० कोटी व प्रकल्प संनियंत्रण गट (Project Monitoring Unit) व सल्लागाराची नियुक्ती यांच्या खर्चासाठी राज्य योजनेंतर्गत २ स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण उघडण्यात यावीत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२१११०१७०११२८६१९ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(लहुराज माळी)
संचालक

प्रत —

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा. विरोधीपक्ष नेता, विधानपरिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
८. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. सर्व मा. मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई.
१२. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.

१४. सचिव व महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१५. सार्वजनिक बांधकाम विभाग (किनारी अभियंता), बांद्रा, मुंबई.

१६. मुख्य अभियंता, महावितरण, प्रकाशगड,बांद्रा, मुंबई.

१७. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत शाखा), मुलुंड, मुंबई.

१८. निवडनस्ती.